रजि. नं. : ई -६९, अहमदनगर

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

शिर्डी : पोस्ट : शिर्डी - ४२३ १०९, ता.राहाता, जि.अहमदनगर, महाराष्ट्र (भारत).
दुरध्वनी : + ९१-२४२३ - २५८५०० फॅक्स : + ९१-२४२३-२५८ ७७०, टेलिग्राम : साईनाथ, शिर्डी.

जा.नं.एसएसएस/वशी-पीआरओ/1030/२०२४
दिनांक - 25 JUN 2024

प्रति,
------------------
------------------
------------------

**विषय – श्री साईबाबा संस्थान मार्फत राबविणेत येणारे विविध उपक्रम व सेवासुविधांची साईभक्तांना माहिती होणेकरीता माहितीपट (Documentary)तयार करणेकामी कोटेशन पत्र देणे बाबत.**

महोदय,

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे करीता बहुभाषिक माहितीपट (Documentary) तयार करणेकामी तपशील खालील प्रमाणे –

| अ.नं. | तपशील | मागणी | दर | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | **बहुभाषिक माहितीपट (Documentary) (व्हिडीओ, ऑडीओ, इडिटींग) यासह इतर सर्व अनुषंगीक बाजूंच्या पुर्ततेसह तयार करणे.** | **एक माहितीपट साधारण ०५ ते १० मि.पर्यत** | | |
| ०२ | **तयार करणेत आलेल्या माहितीपटाचे ऑडीओद्वारे इतर भाषेत सर्व अनुषंगीक बाजूंच्या पुर्ततेसह रुपांतर करणे.** | | | |
| **एकूण रक्कम –** | | | | |
| **जी.एस.टी./ सर्व करांसह -** | | | | |
| **एकूण रक्कम -** | | | | |
| **अक्षरी रक्कम रुपये -** | | | | |

**अटी व शर्ती –**

१. माहितीपट तयार करणेकामी शासकिय, निमशासकिय व विविध संस्थानचे माहितीपट तयार करण्याचा अनुभव असलेल्या जाहिरात एजन्सीं यांचा प्रथम प्राधान्याने विचार करणेत येईल. त्यामुळे संबंधीत एजन्सी यांनी दरपत्रके द्यावीत व त्यासोबत अनुभवाचे कागदपत्र सादर करावेत.
२. अ.नं. ०१ मध्ये नमुद केलेप्रमाणे संबंधीतांकडून दरपत्रके आली नाहीत तर इतर एजन्सीं कडून प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा विचार करणेत येईल.
३. दरपत्रक देतांनी एका माहितीपट (Documentary) साठी द्यावेत. तदनंतर संस्थानचे मागणीनुसार बहुभाषीक वाढीव माहितीपट तयार करावयाचे झाल्यास मंजुर दरात माहितीपट तयार करुन देणे आपणांवर बंधनकारक राहील.
४. कोटेशन पत्रात मागणी केलेनुसार माहितीपटाचे दर जी.एस.टी./ सर्व करांसहीत द्यावेत तसेच याकामी कुणास साईबाबांची सेवा करावयाची असल्यास तसे निशुल्क अथवा नाममात्र दर कळविण्यात यावेत मात्र, यामध्ये कामाचा दर्जा उच्चतम प्रतीचा /उत्कृष्ट असावा. तथापि, याबाबत अ.नं.०१ मध्ये नमुद केलेप्रमाणे दरपत्रके न आल्यास विचार करणेत येईल.
५. कार्यादेश दिल्यानंतर कार्यादेशात नमुद केलेल्या भाषेत ०१ महिन्यांत उत्कृष्ट /उच्चतम प्रतीचा माहितीपट तयार करुन द्यावा लागेल.
६. कोणतेही अगर सर्व कोटेशन स्वीकारणे अथवा नाकारणेचा हक्क संस्थानने राखून ठेवला आहे.
७. माहितीपट तयार करणेकामी शिर्डी येथे येवून आवश्यक माहिती संकलन करणेची तसेच संकलीत केलेल्या माहितीचा दुरुपयोग होणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल तसेच सदर माहिती आपल्याला व्यावसायिक कामासाठी वापरता येणार नाही, आपले काम संपताच सर्व माहिती पुनश्च संस्थानला सुपूर्द करुन द्यावी लागेल याची संपुर्ण जबाबदारी स्वत: आपणांवर राहील.
८. माहितीपट तयार करुन दिलेनंतर बीलाची रक्कम संस्थानचे विहीत पध्दतीने आदा करणेत येईल.
९. सदरचा माहितीपट (व्हिडीओ, ऑडीओ, इडिटींग) यासह सर्व अनुषंगीक बाजूंच्या पुर्ततेसह तयार करुन कार्यान्वीत करुन देणेची जबाबदारी स्वत: आपणांवर राहील. आपले कोटेशन उपरोक्त प्रमाणे स्वत:चे फर्मचे लेटरहेडवर मोहोरबंद पाकिटात **जनसंपर्क कार्यालय, माहितीपट कोटेशन** असे पाकिटावर स्पष्ट नमुद करुन कोटेशन मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या नावे दि.**०८/ ०७** /२०२४ पर्यंत वरील अटी व शर्तीस अधीन राहून तातडीने पाठविण्याचे करावे. त्यानंतर आलेल्या कोटेशनचा विचार केला जाणार नाही.

(प्रज्ञा महांडुळे)
प्रशासकिय अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी



Scanned by CamScanner